# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | | Website : http://maha-arogya.gov.in[ |
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर ) | २२६२१००६ | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६११४७१ | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२०२४९ | 022- 22679044(Hosp.) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२११८६ | 022-22622155(CAO) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६२८२ | 022-22703785(Control Room) |
| | २२६२६७५५ | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |


| <u>सुधारित प्रतिनियुक्ती आदेश</u> | क्र.संआसे/मवैआसे/नीट-पीजी २०१८/पदविका अभ्यासक्रम/ १०४५-११०१ पी.जी.सेल/२०१८. दिनांक :- १९/०५/२०१८. |
|---|---|

विषयः- नीट पीजी-२०१८

**महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांना सेवांतर्गत पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सत्र-२०१८ करिता प्रतिनियुक्ती देणेबाबत.**

संदर्भः- १) शासन निर्णय क्र.मवैअ-१०/प्र.क्र.२०१०/३९०/प्र.क्र.३६६/सेवा-३, दि.१९.६.२०१० व दि.३.५.२०११.

२) क्र.संआसे/मवैआसे/नीट-पीजी २०१८/पी.जी.सेल/८५२-९०६/२०१८. दिनांक :- २७/०४/२०१८.

३) आदेश क्र.संआसे/मवैआसे/नीट-पीजी २०१८/पदविका अभ्यासक्रम/पी.जी.सेल/ १०३०-११५६/२०१८ दिनांक :- १७/०५/२०१८

उपरोक्त विषयाचे संदर्भित आदेश क्र. ३ रद्द करण्यात येत आहेत. सुधारित प्रतिनियुक्ती आदेश खालील प्रमाणे आहेत.

संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई हे सोबत जोडलेल्या प्रपत्रा मध्ये पदविका अभ्यासक्रमाकरीता निवड झालेल्या वैदयकीय अधिका-यांची विषय निहाय व वैद्यकीय महाविदयालय निहाय यादी दर्शविण्यात आलेली आहे. महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांना सन २०१८ च्या सत्रासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विषयांमध्ये पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता शासकीय वैद्यकीय महाविदयालयात प्रतिनियुक्तीने पाठविण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. वैद्यकीय अधिका-यांना अभ्यासक्रमास रुजू होणे शक्य व्हावे म्हणून या आदेशाद्वारे त्यांना कार्यमुक्त करण्यांत येत आहे. त्यांना हे आदेश प्राप्त होताच त्वरीत त्यांनी निवड केलेल्या महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी रुजू व्हावे.

<u>प्रतिनियुक्ती नियम व अटी खालील प्रमाणे राहतील:-</u>

१) वैद्यकीय अधिका-यांची ज्या विषयासाठी त्यांची निवड झाली आहे त्या विशिष्ट विभागात काम करण्याची परवानगी दयावी.

२) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यांत आलेले वैद्यकीय अधिकारी त्यांचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते शासनाची किमान ३ वर्षे सेवा (रजा व अनुपस्थिती वगळून) करतील असे बंधपत्र (हमीपत्र) अभ्यासक्रमासाठी

रुजू होण्यापूर्वी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे विहीत मार्गाने भरुन देणे बंधनकारक राहील. बंधपत्रातील अटी न पाळल्यास पदवी नोंदणीधारकांना रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त) एवढी बंधपत्राची रक्कम शासनाकडे जमा करावी लागेल.

३) महाराष्ट्र नागरी सेवा नियम ९ (१६) (सी) प्रमाणे प्रतिनियुक्तीचा कालावधी व प्रवासाचा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यांत येईल.

४) प्रशिक्षणासाठी गेलेल्यांना फक्त जाण्यायेण्याचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. मात्र प्रतिनियुक्तीच्या कालावधीत त्यांना प्रतिनियुक्ती भत्ता देय असणार नाही.

५) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-यांशी संबंधित संस्थाना जर काही तारणधन (**Caution Money**) आवश्यक असतील तर ते अदा करावे.

६) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी मान्य केल्याप्रमाणे संबंधित अधिष्ठातांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्यांत आलेल्या वैद्यकीय अधिका-यांची निवासी वैद्यकीय अधिका-यांप्रमाणे निवासाची व्यवस्था करावी.

७) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यांत आलेल्या वैद्यकीय अधिका-यांचा सर्वसाधारणपणे प्रतिनियुक्तीचा कालावधी संबंधित महाविदयालयाचे नियमाप्रमाणे राहील.

८) संबंधित अधिष्ठातांनी सदर वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीने ज्या दिवशी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रुजू होतील, तसेच त्यांचा प्रतिनियुक्ती कालावधी ज्या दिवशी समाप्त होईल, त्याबाबत संबंधित उपसंचालक आरोग्य सेवा, तसेच संचालक आरोग्य सेवा मुंबई यांना कळविण्यांत यावे.

९) प्रतिनियुक्तीवर पाठविण्यांत आलेल्या वैद्यकीय अधिका-यांना प्रतिनियुक्तीकरिता विशेष भत्ता देण्यांत येणार नाही.

१०) संबधित वैद्यकीय अधिका-यांनी मुळच्या पदावरुन पदमुक्त झाल्याची तारीख, तसेच संबंधित महाविदयालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीने रुजू झाल्याची तारीख सर्व संबधितांना तसेच या संचालनालयास त्वरित कळविण्यांत यावी.

११) वैद्यकीय अधिका-यांना महाविदयालयात रुजू होणे बंधनकारक असल्यामुळे संचालनालय स्तरावरुन त्यांना या आदेशाद्वारे करण्यात येत आहे. रुजू अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांचे वेतन प्रचलित नियमाप्रमाणे संचालनालय स्तरावरुन त्यांना अदा करण्यात येईल.

१२) वैद्यकीय अधिका-यांनी त्यांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर संबंधित महाविदयालयातून पदमुक्त होऊन संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथे हजर व्हावे आणि त्यानंतर तात्काळ संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे पुढील पदस्थापनेचे आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी पत्रव्यवहार करावा.

१३) संबंधित अधिष्ठातांनी महाविदयालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर असलेल्या वैद्यकीय अधिका-यांचा प्रतिनियुक्ती कालावधी समाप्त झाल्याबाबतची सूचना संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना १ महिना आगाऊ कळवावी, जेणेकरुन सदरहु अधिका-यांना त्वरीत पदस्थापना देता येईल.

१४) वरील नियमांतील कोणत्याही नियमाच्या तरतुदीबददल वाद निर्माण झाल्यास/अर्थाबाबत शंका उपस्थितीत करण्यांत आल्यास याबाबत मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेली स्पष्टीकरणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील. वरील नियमांत कोणत्याही वेळेस पूर्वसूचना न देता सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील.

(डॉ. संजिव कांबळे) 22/4

**संचालक, आरोग्य सेवा,**

**मुंबई**

प्रति,

डॉ.........................

(संबंधित वैद्यकीय अधिकारी)

**प्रत सस्नेह अग्रेषित-**

१. अधिष्ठाता, इंदिरा गांधी स्मृति वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.
२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद
३. अधिष्ठाता, बै.जी. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे
४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.
५. अधिष्ठाता, लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई.
६. अधिष्ठाता, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
७. अधिष्ठाता,टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज, मुंबई.
८. अधिष्ठाता, सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई.
९. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, जि.सांगली.
१०. अधिष्ठाता, डॉ.वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
११. अधिष्ठाता, स्वा.रा.ति.ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ........... (सर्व)
२. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ............. (सर्व)
३. जिल्हा शल्य चिकित्सक............... (सर्व)
४. उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ............. (सर्व)
५. जिल्हा कोषागार अधिकारी ............. (सर्व)
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई.

**प्रत सविनय सादर :-** मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

# आरोग्य सेवा संचालनालय

## (महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | २२६२१०३१-३६ | Website : http://maha-arogya.gov.in[ |
| संचालक (वैयक्तिक ) | २२६२१००६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर ) | २२६११४७१ | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६२०२४९ | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८६ | 022- 22679044(Hosp.) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22622155(CAO) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६७५५ | 022-22703785(Control Room) |
| | | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |


**सुधारित नोंदणी आदेश**

क्र.संआसे/मवैआसे/नीट-पीजी२०१८/पदविका अभ्यासक्रम/पी.जी.सेल/ १८७०-२०७३ /२०१८. दिनांक :- १९/०५/२०१८.

विषयः- नीट पीजी-२०१८

**महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांना सेवांतर्गत पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सत्र-२०१८ करिता नोंदणी देणेबाबत.**

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.मवैअ-१०/प्र.क्र.२०१०/३९०/प्र.क्र.३६६/सेवा-३, दि.१९.६.२०१० व दि.३.५.२०११.

२) क्र.संआसे/मवैआसे/नीट-पीजी२०१८/पी.जी.सेल/७६१-८५१/२०१८. दिनांक :- २७/०४/२०१८. नोंदणी आदेश.

३) आदेश क्र.संआसे/मवैआसे/नीट-पीजी२०१८/पदविका अभ्यासक्रम/पी.जी.सेल/ ९१७-१०२९/२०१८ दिनांक :- १७/०५/२०१८.

उपरोक्त विषयाचे संदर्भित आदेश क्र. ३ रद्द करण्यात येत आहेत. सुधारित नोंदणी आदेश खालील प्रमाणे आहेत.

पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम विद्यार्थी प्रवेशासाठी केंद्र शासनामार्फत नीट-पीजी २०१८ परीक्षा घेण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर परिक्षेमध्ये उत्तीर्ण सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांची गुणवत्तेनुसार नावांची शिफारस या संचालनालयास केली आहे. सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाकरीता निवड झालेल्या वैदयकीय अधिका-यांची विषयनिहाय व महाविदयालय निहाय निवड यादी देण्यात आली आहे.

१) पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या सेवांतर्गत वैद्यकिय अधिकाऱ्यांना पदव्युत्तर पदविका प्रतिनियुक्तीवर पाठविण्यांत आलेले वैद्यकीय अधिकारी त्यांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते शासनाची किमान ३ वर्षे सेवा करतील असे बंधपत्र (हमीपत्र) अभ्यासक्रमासाठी रुजू होण्यापूर्वी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे विहीत मार्गाने भरुन देणे बंधनकारक राहील.

जर बंधपत्रातील अटी न पाळल्यास पदविका नोंदणीधारकांना रु.५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष फक्त) एवढी बंधपत्राची रक्कम संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे जमा करतील असे बंधपत्र अभ्यासक्रमाकरिता कार्यमुक्त करण्यापुर्वी संबधीत जिल्हा आरोग्य अधिकारी, प्राचार्य/प्रपाठक यांनी रु.१०० च्या स्टॅप पेपरवर संबंधित वैदयकिय अधिकारी यांच्याकडून भरुन घेणे आवश्यक राहील. सदरहु बंधपत्राची मुळप्रत व त्याबाबत संबंधित वैदयकिय अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेऊन त्याची प्रत प्राप्त झाल्याशिवाय त्यांना कार्यमुक्त करण्यांत येऊ नये व १५ दिवसांच्या आत सदरहू बंधपत्राची मुळप्रत व सेवापुस्तकातील नोंदीची प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, प्राचार्य प्रपाठक यांनी या संचालनालयास सादर करावी.

२) पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सेवा जेवढया कालावधीनंतर सोडणार त्याप्रमाणात बंधपत्राची रक्कम वसूल करण्यात येईल. या संबंधी शासनाचा निर्णय संबंधित वैद्यकीय अधिका-यांवर बंधनकारक राहील.

३) पदव्युत्तर पदविकेकरिता नोंदणी देऊन प्रतिनियुक्ती दिलेल्या वैद्यकीय अधिका-याने अभ्यासक्रमाकरिता रुजू होऊन अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास /अभ्यासक्रम मध्येच सोडून दिल्यास प्रतिनियुक्ती कालावधीत त्यांना देण्यात आलेले वेतन व भत्ते त्यांच्याकडून वसूल करण्यात येतील. तसेच परत नोंदणीसाठी विचार केला जाणार नाही.

४) पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांची माहिती संबंधित वैद्यकीय महाविद्यालयांना आरोग्य सेवा संचालनालयाकडून दिली जाईल. त्याचप्रमाणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात संबंधित उमेदवारांना नोंदणी देण्यांत येईल. पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता प्रतिनियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित अधिका-यांने त्यांना नोंदणी दिलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात दिलेल्या विषयांत नोंदणी प्राप्त करुन घेण्याकरिता अधिष्ठातांकडे अर्ज करुन ती त्वरीत घेणे आवश्यक राहील.

५) पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता नोंदणी देण्यांत आलेल्या उमेदवारांचे अभ्यासक्रम वर्ष पूर्ण होऊन अंतिम परिक्षेला बसलेल्या उमेदवारांना परिक्षा संपताच प्रतिनियुक्ती दिलेल्या वैद्यकीय महाविद्यालयातून कार्यमुक्त करण्यांत येईल. प्रथम प्रयत्नाकरिता परिक्षेला बसले नाहीत अथवा उत्तीर्ण झाले नाहीत किंवा त्यांच्या जागी दुस-या वैद्यकीय अधिका-याला प्रतिनियुक्ती मिळाली नाही म्हणून उमेदवारांची बदली स्थगित करता येणार नाही किंवा कार्यमुक्त करण्याचे पुढे ढकलता येणार नाही.

६) सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना या आदेशान्वये संचालनालय स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यांत येत आहे. सेवांतर्गत वैदयकीय अधिका-यांनी प्रथम संबंधित वैद्यकीय महाविदयालयात त्वरीत रुजू व्हावे, व त्यानंतर मुळ पदावरुन कार्यमुक्त व्हावे. उमेदवाराने नोंदणी न घेतल्यास ती नोंदणी आपोआप रद्द होईल व उमेदवाराकडून प्रचलित नियमानुसार दंड आकारण्यांत येईल. तसेच संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीमध्ये त्यांची आस्थापना संचालनालय स्तरावरुन हाताळली जाणार आहे.

७) अभ्यासक्रमाच्या कालावधीत शक्य तो रजेवर जाऊ नये तसेच रजेची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे रजा घेतल्यास त्याची माहिती संबंधित वैद्यकीय महाविदयालयाच्या अधिष्ठाता मार्फत संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना कळवावी. ही रजा संबंधित विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उपस्थितीच्या नियमानुसार राहील.

८) पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना निवासाकरिता एक खोली संबंधित वसतीगृहात उपलब्ध करुन दिली जाईल. अभ्यासक्रमाचा अवधी पूर्ण होताच ती खोली रिक्त करावी लागेल.

९) उमेदवारांना अन्य कोणत्याही ठिकाणी त्यांचे ताब्यात कुटुंब निवासस्थान (फॅमिली निवासस्थान) नसल्यास अभ्यासक्रमाच्या ठिकाणी फॅमिली निवासस्थान उपलब्धतेनुसार देण्याचा विचार करण्यांत येईल. मात्र फॅमिली निवासस्थान उपलब्ध करुन देण्याचे बंधन राहणार नाही.

१०) प्रतिनियुक्तीचा कालावधी ही तात्पुरती बदली समजण्यांत येऊन मुंबई नागरी सेवा नियम ३३९ व ३४४ मध्ये विहित केल्याप्रमाणे तसेच मुंबई नागरी सेवा नियम खंड (२) मधील परिशिष्ठ १५ मध्ये विहित करण्यांत आलेल्या सर्वसाधारण नियमाच्या अधिन राहून घरभाडे भत्ता देय राहील.

११) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर असलेल्या वैद्यकीय अधिका-यांचे वेतन व भत्ते संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथून काढण्यात येतील.

१२) शासन निर्णय क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.६२६/११/सेवा-३/मंत्रालय, मुंबई दि.७.८.२०१२ अन्वये ज्या सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांना उच्च शिक्षणासाठी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल अशा वैद्यकीय अधिका-यांना प्रशिक्षण कालावधी दरम्यान व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

१३) सेवांतर्गत वैदयकीय अधिका-यांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ते संचालक, आरोग्य सेवा, मुंबई येथे हजर होतील व त्यांनी आपला रुजू अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे सादर करावेत व पुढील पदस्थापनेकरीता त्यांनी त्यांचा विकल्प संचालनालयास सादर करावा.

पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरळीत व सुकर पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून तसेच विद्यापीठाच्या विनियमांची गरज भागविण्याच्या दृष्टीने संबंधित वैद्यकीय अधिका-यांना पूर्ण वेळ विषयाच्या विभागात काम करणे आवश्यक असल्यामुळे त्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यांत येत आहे. सदर नियुक्तीमुळे वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीच्या कालावधीत रजिस्टारप्रमाणे सर्व सवलतीस पात्र राहतील.

(डॉ. संजिव कांबळे)
संचालक, आरोग्य सेवा,
मुंबई.

प्रति,

डॉ..........................
(संबंधित वैद्यकीय अधिकारी)

**प्रत सस्नेह अग्रेषित-**

१. अधिष्ठाता, इंदिरा गांधी स्मृति वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.
२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद
३. अधिष्ठाता, बै.जी. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे
४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.
५. अधिष्ठाता, लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई.
६. अधिष्ठाता, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
७. अधिष्ठाता,टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज, मुंबई.
८. अधिष्ठाता, सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई.
९. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज, जि.सांगली.
१०. अधिष्ठाता, डॉ.वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर
११. अधिष्ठाता, स्वा.रा.ति.ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

**प्रतः- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ........... (सर्व)
२. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ............. (सर्व)
३. जिल्हा शल्य चिकित्सक............... (सर्व)
४. उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ............. (सर्व)
५. जिल्हा कोषागार अधिकारी ............. (सर्व)
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई.

**प्रत सविनय सादर :-** मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

क्र.संआसे/मवैआसे/नीट-पीजी२०१८/पदविका अभ्यासक्रम/पी.जी.सेल/ /२०१८.

दिनांक :- १९/०५/२०१८.

नीट पीजी-२०१८ पदव्युत्तर - पदविका अभ्यासक्रमासाठी नोंदणी दिलेल्या वैदयकिय अधिका-यांचा तक्ता

| अ. क्र. | विषय | जागा | वैदयकिय महाविदयालयाचे नाव | वैदयकिय अधिका-याचे नाव | मूळ प्रवर्ग | निवड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | D.G.O. | १ | इंदिरा गांधी शासकिय वैदयकिय महाविदयालय नागपूर | डॉ. देवरी बिधान कुटिश्वर | खुला | खुला |
| २ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | डॉ. गिरेपूंजे मेघा | इ.मा.व. | खुला |
| ३ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | डॉ. कांबळे अरविंद नामदेवराव | अ. जा. | अ.जा. |
| ४ | | १ | बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे | डॉ. पवनकुमार भरत शिंदे | भ.ज. | अ.जा. |
| ५ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | डॉ. सिंहमारे रोशन प्रल्हादराव | अ. ज. | अ.ज. |
| | एकूण | ५ | | | | |
| ६ | D.M.R.D. | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | डॉ.समिर श्रीधर नागदेवते | अ. जा. | अ.जा. |
| ७ | | १ | लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई | डॉ. सय्यद अझरुदिदन सय्यद | खुला | खुला |
| ८ | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. जाधव रुपेश रमेश | अ. जा. | अ.जा. |
| ९ | | १ | टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज मुंबई | डॉ. विश्वंभर सचिन अशोक | इ.मा. व. | इ.मा. व. |
| १० | | १ | सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई | डॉ.भोये प्रकाश देवराम | अ. ज. | अ.ज. |
| | एकूण | ५ | | | | |
| ११ | D.P.M | १ | बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे | डॉ. मेश्राम माधुरी बक्शी | अ. जा. | अ.जा. |
| १२ | | १ | लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई | डॉ. कांबळे प्रदिप बाबुराव | अ.जा. | खुला |
| | एकूण | २ | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | | १ | सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई | डॉ. पातूरकर नचिकेत अनंत | खुला | खुला |
| १४ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | डॉ. हरन गजानन सातवराव | खुला | खुला |
| १५ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | डॉ. तलमले केतन | इ.मा.व. | इ.मा.व. |
| १६ | | १ | टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज मुंबई | डॉ. बनसोडे समिर सदाशिव | अ.जा. | अ.जा. |
| १७ | | १ | सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई | डॉ. सोनकांबळे प्रशांत | अ.जा. | खुला |
| १८ | D.C.H. | १ | सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय, परेल, मुंबई | डॉ. झाकिर हुसन मुजाफर | खुला | खुला |
| १९ | | १ | शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज | डॉ. आशिष देशपांडे | खुला | खुला |
| २० | | १ | डॉ. वैशंपायन स्मृति वैदयकिय महाविदयालय, सोलापूर | डॉ. हाके स्वप्नील मोहन | भ.ज. | भ.ज. |
| २१ | | १ | इंदिरा गांधी शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | डॉ. देवेंद्र गुरुदासजी लाडे | अ.जा. | इ.मा.व. |
| २२ | | १ | लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई | डॉ. चव्हाण चेतन पुरुशोत्तम | अ.ज. | अ.ज. |
| २३ | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. पवार योगेश सुभाष | खुला | खुला |
| | एकूण | ११ | | | | |
| २४ | | १ | टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज मुंबई | डॉ. कळंबे मनिष सुभाष | इ.मा.व. | खुला |
| २५ | D.A. | १ | टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज मुंबई | डॉ. मुलगिर सुरेश ज्ञानोबा | भ.ज.ब | भ.ज.ब |
| २६ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | डॉ. सातभाई प्रफुल्ल एकनाथ | भ.ज. | खुला |
| २७ | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. चेतन मनोहरराव चौधरी | इ.मा.व. | खुला |
| २८ | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय | डॉ. खैरे तुषार कारभारी | इ.मा. | खुला |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महाविद्यालय, मुंबई | | व. | |
| २९ | D.A. | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. स्मिता विलास सोनवणे | अ.जा. | इ.मा.व. |
| ३० | | १ | लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई | डॉ. अलंकार दिलीप करंबे | इ.मा.व. | इ.मा.व. |
| | एकूण | ७ | | | | |
| ३१ | D- Ortho. | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | डॉ. लांजूरकर श्रीकांत | इ.मा.व. | खुला |
| ३२ | | १ | बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे | डॉ.गोडबोले नितीन कोंडिंबा | अ.जा. | खुला |
| ३३ | | १ | बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे | डॉ. मुराळे प्रविण सोहनलाल | भ.ज. | भ.ज. |
| | एकूण | ३ | | | | |
| ३४ | D.P.H. | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | डॉ. सुने प्रफुल्ल सुरेशराव | इ.मा.व. | खुला |
| ३५ | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. संगिता वसंत सोनावणे | अ.जा. | अ.जा. |
| ३६ | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. नंदगवळी दर्शना | अ.जा. | अ.ज. |
| ३७ | | १ | डॉ. वैशंपायन स्मृति वैदयकिय महाविदयालय, सोलापूर | डॉ. संतोष केरबा गायकवाड | अ.जा. | खुला |
| ३८ | | १ | लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई | डॉ. रत्नमाला महादेव सकपाळ (डॉ. रत्नमाला विशाल नांदगाये) | अ.जा. | खुला |
| ३९ | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. शिवाजी नागनाथ थोरात | अ.जा. | खुला |
| ४० | | १ | ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | डॉ. पाटिल वंदनकुमार गजानन | इ.मा.व. | इ.मा.व |
| ४१ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज | डॉ. चौगुले अशा बाबुराव | भ.ज. | इ.मा.व. |
| ४२ | | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | डॉ.भाग्यश्री डि. सोनपिंपळे | अ.जा. | खुला |
| ४३ | | १ | लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, | डॉ.देशमुख तुषार सुरेश | इ.मा.व. | इ.मा.व. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | D.P.H. | | सायन, मुंबई | | | |
| ४४ | | १ | लो.टि.वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई | डॉ.लोहारे बसवराज संघनाथ | खुला | खुला |
| ४५ | | १ | डॉ. वैशंपायन स्मृति वैदयकिय महाविदयालय, सोलापूर | डॉ.थेरे समिर गोविंदराव | इ.मा.व. | इ.मा.व. |
| ४६ | | १ | बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे | डॉ.पवार सुरेंद्र अंकुश | भ.ज. | खुला |
| | **एकूण** | **१३** | | | | |
| ४७ | **D.T.C.D.** | १ | बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय, पुणे | डॉ. वाघ निलेश शंकरराव | इ.मा.व. | इ.मा.व. |
| | **एकूण** | **१** | | | | |
| ४८ | **D.C-P.** | **१** | डॉ. वैशंपायन स्मृति वैदयकिय महाविदयालय, सोलापूर | डॉ. महेश बाबुराव केसाळे | भ.ज.ब. | भ.ज.ब. |
| | **एकूण जागा** | **४८** | | | | |

(डॉ. संजिव कांबळे)
संचालक, आरोग्य सेवा,
मुंबई.